गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २६ वा ● सोमवार १२ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| Volume 1 | Issue 26 | Date : 12/06/2023 | blow : Manday | Page 4 | Price 4

### हवामान विभागाकडून आनंदाची बातमी...
## मोसमी पाऊस राज्यात दाखल

पुणे : अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर मोसमी पाऊस अखेर रविवारी, अकरा जून रोजी दुपारी राज्यात दाखल झाला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार रत्नागिरीत मोसमी पाऊस दाखल झाला असून, हलक्या आनंद सरीही सुरू झाल्या आहेत.

राज्यात सामान्यपणे मोसमी पाऊस सात जून रोजी दाखल होतो. पण, यंदा केरळमध्ये मोसमी पाऊस उशिराने म्हणजे बुधवारी सात जून रोजी दाखल झाला होता. पुढील वाटचालीस पोषक हवामान असल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार रविवारी मोसमी वाऱ्यांनी रत्नागिरीत हजेरी लावली आहे. राज्यात मोसमी वारे दाखल होत असतानाच






कर्नाटकात शिमोगा, हसनपर्यंत मोसमी वाऱ्यांनी मुसंडी मारली आहे. पश्चिम बंगालमध्येही मोसमी वारे दाखल झाले आहे.पुणे वेधशाळेच्या हवामान विभागाचे अंदाज प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी रविवारी सकाळी समाजमाध्यमावर कोकण किनारपट्टीवर मोठ्या संख्येने ढग जमा होत असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर हवामान विभागाकडून अधिकृत घोषणेची प्रतिक्षा होती. केरळमध्ये बुधवारी, ७ मे रोजी दाखल झालेला मोसमी पाऊस केवळ चार दिवसांत राज्यात दाखल झाला आहे. साधारणपणे केरळमध्ये दाखल झाल्यानंतर सात-आठ दिवसांनी मोसमी पाऊस राज्यात दाखल होतो. यंदा केरळमध्ये दाखल झाल्यानंतर केवळ चारच दिवसांत मोसमी वारे राज्यात दाखल झाले आहे.

## नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करा : राज्यपाल रमेश बैस
### राष्ट्रीय धोरणाबाबत विद्यापीठांच्या तयारीचा राज्यपालांकडून आढावा

अकोला : नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी थोडा कालावधी शिल्लक आहे. याबाबत आवश्यक तयारी व भरीव अंमलबजावणी करून महाराष्ट्रातील विद्यापीठांनी देशापुढे उदाहरण उभे करावे, अशी अपेक्षा राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे व्यक्त केली.राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत नऊ अकृषी व कृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात



झाली, त्यावेळी ते बोलत होते. कृषी मंत्री अब्दुल सत्तार, राज्यपालांचे प्रधान सचिव संतोष कुमार, उच्च व तंत्र शिक्षण प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे. पी. गुप्ता आदी यावेळी उपस्थित होते. । पान २ वर

## शेतकऱ्यांची नाहक अडवणूक करणाऱ्या बँकांना कारवाईचा इशारा
### नागरिकांना चकरा नकोत यासाठीच 'शासन आपल्या दारी' अभियान : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर : समाजातील सामान्यातील सामान्य माणसाच्या समस्या सोडविण्यासाठी हा यंत्रणेचा डोलारा आहे. केवळ आम्ही आयोजित केलेल्या अभियानासाठी नव्हे. तर कायमस्वरूपी कोणालाही कार्यालयामध्ये चकरा माराव्या लागू नये यासाठीच 'शासन आपल्या दारी अभियान ', राबवित असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.मौदा येथील एनटीपीसी सभागृहामध्ये शासन आपल्या दारी अभियानांतर्गत मौदा उपविभागीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. नागपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील उपविभागीय स्तरावरची ही सहावी



बैठक आज पार पडली. यापूर्वी हिंगणा,उमरेड, काटोल ,नरखेड या ठिकाणी मान्सून पूर्व उपविभागीय आढावा तसेच शासन आपल्या दारी अंतर्गत लाभार्थींना विविध योजनातून प्रमाणपत्र वाटप करण्यात आले होते.

सकाळी रामटेक नंतर मौदा येथे बैठकीत बोलताना त्यांनी शासन आपल्या दारी हे केवळ अभियान नसून ही यंत्रणेला कायमस्वरूपी सवय व्हावी, असे सूत्र असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ आज मंत्री आले म्हणून लाभार्थींना लाभ दिले जाऊ नयेत. यंत्रणाच कायमस्वरूपी अशा पद्धतीची बनावी की, न्याय हक्कासाठी कोणालाही शासकीय कार्यालयाच्या चकरा माराव्या लागू नयेत. प्रत्येकाचे लाभ त्याच्या घरापर्यंत त्याला मिळाले पाहिजे. शासकीय यंत्रणांनी आता लाभार्थींपर्यंत जाण्याच्या प्रक्रियेमध्ये स्वतःला बदलून घ्यावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे, टेकचंद सावरकर ,आशिष जायस्वाल, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा, अप्पर जिल्हाधिकारी आशा पठाण, उपविभागीय अधिकारी संजय पवार यांच्यासह जिल्ह्यातील व उपविभागातील अधिकारी उपस्थित होते.उपविभागीय अधिकारी संजय पवार यांनी सादरीकरण केले. तत्पूर्वी, विविध योजनांतील लाभार्थ्यांना पट्टेवाटप, प्रमाणपत्र वाटप, तसेच लाभाच्या योजनांचे पत्र देण्यात आले.उपमुख्यमंत्र्यांनी शासन आपल्या दारी अभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीबद्दल गांभीर्याने काम करण्याचे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना सांगितले. सुमारे दीड लाख नागरिकांना लाभ द्यायचा आहे. एकही अर्ज प्रलंबित राहू नये. ज्यांना काम करताना अडचणी येतील त्यांच्या अडचणी सोडवल्या जातील. मात्र, अडचणी सांगणारे अधिकारी बनू नका. । पान २ वर

## मणिपूरमध्ये ५० हजार लोक शिबिरांच्या आश्रयाला

इम्फाळ : मणिपूरमधील जातीय हिंसाचारामुळे विस्थापित झालेले ५० हजारांहून अधिक नागरिक राज्यभरातील ३४९ मदत शिबिरांत राहत आहेत. राज्याचे माहिती व जनसंपर्क मंत्री व राज्य सरकारचे प्रवक्ते डॉ. आर. के. रंजन यांनी रविवारी सांगितले की, सर्व जिल्ह्यांत विशेषत: संवेदनशील भागात शोध मोहीम सुरू करण्यात आली आहे. आतापर्यंतच्या कारवाईत ५३ शस्त्रे आणि ३९ बॉम्ब जप्त करण्यात आले आहेत. रंजन यांनी सांगितले, की या हिंसाचाराची झळ पोहोचलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आराखडा तयार करण्यात आला असून, तो लवकरच जाहीर केला जाईल. या हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या एकूण ५० हजार ६९८ नागरिकांनी सध्या ३४९ मदत शिबिरांत आश्रय घेतला आहे. विशेषत: महिला, वृद्ध आणि मुलांसाठी उघडलेल्या मदत केंद्रांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. जीवनावश्यक वस्तूंच्या दरवाढीवर नियंत्रणासाठी दरनियंत्रण यंत्रणा कार्यान्वित केली आहे. राष्ट्रीय महामार्ग ३७ द्वारे विविध वस्तूंची राज्यात आणल्या जात आहेत.

मे महिन्याच्या सुरुवातीला हिंसाचार उफाळला तेव्हा पोलिस ठाण्यांतून मोठ्या प्रमाणात शस्त्रे लुटण्यात आली. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकांना शस्त्रत्यागाचे आवाहन केले आहे. पूर्व इम्फाळच्या आमदारांनी आपल्या निवासस्थानी ठेवलेल्या 'ड्रॉप बॉक्स'मध्ये ओळख उघड न करता शस्त्रे जमा करण्याचे आवाहन केले होते. युवकांनी त्याला पसंती देत आतापर्यंत स्वयंचलित रायफलींसह १३० शस्त्रे जमा केली आहेत.

## देशाच्या विदेशी चलन साठ्यात ५.९ अब्ज डॉलर्सची वाढ

नवी दिल्ली : सलग दोन आठवडे विदेशी चलन साठ्यात घसरण झाल्याच्या पार्श्वभूमीवर २ जून रोजी संपलेल्या आठवड्यात हा साठा ५.९ अब्ज डॉलर्सने वाढला आहे. रिझर्व्ह बँकेकडून ही माहिती देण्यात आली. दोन आठवड्यात विदेशी चलन साठ्यात एकूण ४.३४ अब्ज डॉलर्सची घट होत हा साठा ५८९.१४ अब्ज डॉलर्सवर पोहोचला होता. मात्र २ जून रोजी संपलेल्या आठवड्यात हा साठा ५.९ अब्ज डॉलर्सने वाढून ५९५.०६ अब्ज डॉलर्सवर गेला आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये विदेशी चलन साठा ६४५ अब्ज डॉलर्सच्या सर्वकालीन उच्चांकी स्तरावर गेला होता. मात्र, त्यानंतर या साठ्यात सातत्याने घट झाली होती. विदेशी चलन साठ्यातील सध्याचे विदेशी चलन मालमत्तेचे प्रमाण ५२६.२० अब्ज डॉलर्स इतके आहे.

## चार दिवसानंतर राज्यातील महामार्गांवरील स्पीड वाढवणार

मुंबईः देशातील द्रुतगती माग आणि राष्ट्रीय महामार्गांवरील वाहनांची वेगमर्यादा वाढवली जाणार असून, पुढील चार दिवसांत याबाबत आदेश काढला जाणार असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे. राज्य सरकार आणि केंद्रात याबाबत वेगवेगळे नियम असल्याने याचा फटका वाहनधारकांना बसत होता. त्यामुळे यावर तोडगा काढण्यात आला असून, चार दिवसांत याचे आदेश निघणार असल्याचे गडकरी म्हणाले आहेत.

सध्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाकडून वाहनांसाठी निश्चित केलेली कमाल वेग मर्यादा राष्ट्रीय महामार्गांवर १०० किमी प्रतितास इतकी आहे. तर द्रुतगती मार्गांवर १२० किमी प्रतितास इतकी वेगमर्यादा आहे. मात्र असं असले तरीही याच महामार्गावर तैनात



असलेले राज्य महामार्ग पोलीस गाडी ९० च्या वरती गेल्यावर २ हजारांचा दंड ठोठावतात. त्यामुळे केंद्र आणि राज्यात याबाबत समन्वय नसल्याने याचा फटका वाहनचालकांना बसत होता.दरम्यान याबाबत 'एबीपी माझा'ने वृत्त दाखवत सर्व प्रकार समोर आणला होता. त्यानंतर याची दखल घेत गडकरी यांनी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. यासाठी त्यांनी देशातील सर्वच राज्यातील रस्ते वाहतूक मंत्र्यांची बैठक बोलावली होती. त्यानंतर आता यावर तोडगा काढण्यात आला आहे. तर पुढील चार दिवसांत नवीन वेग मर्यादेबाबत आदेश काढले जाणार असल्याचे गडकरी म्हणाले आहेत.

पैठण येथे पत्रकार परिषदेत 'एबीपी माझा'च्या प्रतिनिधी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना गडकरी म्हणाले की, या विषयात केंद्र आणि राज्य सरकार दोघांनाही अधिकार आहे. मी यासाठी दिल्लीत रस्ते । पान २ वर

## पुणे-सातारा महामार्गावर दोन कंटेनर, दोन बसची धडक; दोघांचा जागीच मृत्यू तर आठ जण जखमी

पुणे : पुणे शहरात आणि आसपासच्या परिसरात सध्या अपघाताचं प्रमाण चांगलंच वाढलं आहे. दोन बसचा आणि दोन कंटेनरचा अपघात झाला आहे. पुण्यातील खेड शिवापूरला हा अपघात झाला. यात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये एका नऊ वर्षीय मुलीचा समावेश आहे तर आठ जण जखमी झाले आहेत. या घटनेमुळे मुंबई आणि बंगळुरुच्या लेन ठप्प झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-बंगळुरु महामार्गावरील एका लक्झरी बसची एका कंटेनरला धडक बसली आणि ती नियंत्रण सुटून । पान २ वर

## परिवर्तनाच्या लढ्याला अभिजीत आबांचा धक्का गुणकारी ठरणार
### सहकार शिरोमणीचे माजी संचालक दिपक पवार यांचा ठाम विश्वास

पंढरपूर/प्रतिनिधी :सहकार शिरोमणीची प्रगती होण्याऐवजी वरचेवर अधोगती होत असल्याचे चित्र निर्माण करून स्वतःचेच घर भरणाऱ्या चेअरमन काळे यांना बाजूला सारून या कारखान्यावर परिवर्तन घडवून आणण्यासाठी मी आणि रोंगेसर यांनी वेगवेगळे लढत सुरुवात केली होती. त्यावेळी मागील निवडणुकीत अपयश आले होते. मात्र त्यांना त्यातूनही सुधारण्यासाठी अनेक वर्ष संधी मिळूनही कोणताही बदल झाला नाही. त्यामुळे आम्ही आता या निवडणुकीत दोघेही एकत्रित तर आलोच आहोत. परंतु दिलेला शब्द पाळणारा आणि कारखाना चालवणारा माणूस म्हणून ब्रँड ठरलेले श्री विठ्ठल सहकारी साखर




कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडणुकीत मात्र नक्की यश मिळणार असून अभिजीत पाटील यांचाच धक्का परिवर्तनासाठी गुणकारी ठरणार असल्याचा विश्वास याच कारखान्याचे माजी संचालक आणि सध्याचे उमेदवार ड दिपक पवार यांनी व्यक्त केला आहे.

अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखाली परिवर्तन आघाडी पॅनलचे उमेदवार यांच्या प्रचारसाठी शनिवारी तावशी येथे जाहीर सभा आयोजित केली होती. यावेळी दिपक पवार बोलत होते. यावेळी विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील, मार्गदर्शक डॉ बी पी रोंगे सर, अमरजित पाटील, यांच्यासह विठ्ठल चे संचालक उपस्थित होते.पुढे बोलताना दिपक पवार म्हणाले की, या कारखान्यावर परिवर्तन करण्यासाठी मागील सात वर्षांपासून रोपटे लावले होते. तेव्हापासून या कारखान्याच्या सभासद आणि कामगार यांच्या हितासाठी आपण लढा उभा केला होता. यामधून सहकार शिरोमणीचे हजारो सभासद यांचे सीताराम कारखान्याकडे अडकून पडलेले पैसे ही आपण कायदेशीर मार्गाने मिळवून दिले आहेत. आशा हजारो सभासद यांना याची जाणीव राहून ते आमच्याच पॅनलचे उमेदवार यांना मतदान करतील असा आशावादही दिपक पवार यांनी व्यक्त केला आहे. आमचे आणि चेअरमन कल्याणराव काळे। पान २ वर

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान;
### लाखो वारकऱ्यांनी पाहिला सोहळा

देहू : आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. शनिवारी देहूतुन जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखीचे पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे. टाळ- मृदंग आणि ग्यानबा तुकारामाच्या जयघोषात वारकरी दंग झाले होते. इंद्रायणी काठावर वैष्णवांची मांदियाळी बघायला मिळाली. मोठ्या भक्ती भावात आणि उत्साहात ज्ञानोबा माऊलीच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे. पहाटेपासूनच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचा प्रस्थान सोहळा सुरू झाला. विधिवत महापूजा झाल्यानंतर पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले. मुख्य मंदिर आकर्षक फुलांनी सजवण्यात आलं होतं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले होते. पवित्र इंद्रायणी नदीत स्नान करून वारकरी माऊलींच्या प्रस्थान सोहळ्यात सहभागी झाले. ग्यानबा तुकारामाच्या गजराने अवघी आळंदी दुमदुमून गेली होती. प्रस्थानावेळी मुख्य ४७ दिंड्यामधील वारकरी, टाळकरी, ग्यानबा तुकारामाच्या तालावर ठेका धरला होता. टाळ मृदंगाच्या गजरात माऊलींच्या पालखीचे प्रस्थान पंढरपूरकडे झाले. माऊलींची पालखी श्री क्षेत्र आळंदीमधील गांधीवाडा येथील आजोळघरी मुक्कामी असेल. नयनरम्य आणि भव्य सोहळा अनुभवण्यासाठी वारकऱ्यांप्रमाणेच नागरिकांचीही गर्दी बघायला मिळाली.

## ✻ सुविचार ✻

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

# संपादकीय

## सुरक्षित रेल्वे प्रवासासाठी...

कोरोमंडल एक्स्प्रेसच्या अपघातात बळी पडलेल्या २७५ जणांच्या नातेवाइकांनी फोडलेला हंबरडा हृदय पिळवटून टाकणारा होता. गेल्या वीस वर्षांतील या भीषण अपघाताने देश निःस्तब्ध झाला. कोरोमंडल एक्स्प्रेसने मालगाडीला दिलेली धडक इतकी भीषण होती की, या रेल्वेच्या बोगीतील प्रवाशांच्या शरीराचे तुकडे झाले. ओळख न पटण्याइतपत त्यांची अवस्था या अपघाताने केली. कोरोमंडल एक्स्प्रेसच्या बोगी तिसऱ्या लोहमार्गावर पडल्यामुळे यशवंतपूरहून हावडाकडे निघालेल्या दुरांतो एक्स्प्रेसला धडक बसली. सुरुवातीला पन्नास जण मृत्युमुखी पडल्याचे सांगण्यात येत होते. मात्र, दुसऱ्या दिवशी मदत आणि बचाव कार्य सुरू झाल्यानंतर मृतांची संख्या २७५ वर गेली. एक हजार प्रवासी जखमी झाले. त्यातील काहींची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतांची संख्या वाढू शकते. या अपघाताला जबाबदार कोण? त्याची कारणे कोणती, याचा शोध घेतला पाहिजे. अपघात घडला त्यावेळी कोरोमंडल आणि दुरांतो एक्स्प्रेसचा वेग मर्यादितच होता. मानवी चुकांमुळे नसून इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉकिंग व्यवस्थेतील बिघाडामुळे ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक बाब समोर आल्याचे सुरक्षा अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येते. मात्र, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या अपघाताला जबाबदार कोण आहेत याची माहिती आहे, परंतु घातपाताची शक्यता असल्यामुळे केंद्रीय गुप्तचर विभागाकडून (सीबीआय) याचा तपास केला जाईल आणि दोषींवर कडक कारवाई होईल, असे त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घटना स्थळाला भेट दिल्यानंतर मृतात्म्यांना संवेदना व्यक्त करून अपघाताला जे कोणी जबाबदार आहेत त्यांना सोडणार नसल्याचे जाहीर केले आहे. मोदी है तो मुमकीन है, असे नेहमी म्हटले जाते. त्या पध्दतीने मोदी यांचे कार्य पाहायला मिळते. अलीकडच्या काळात 'वंदे भारत' आणि बुलेट ट्रेन या लोकप्रिय आणि वेगवान रेल्वेची पंतप्रधानांनी घोषणा केली. अनेक मार्गांवर वंदे भारतची सेवाही अमलात आणली. दोन रेल्वे एकमेकांसमोर आल्यानंतर अपघात टाळण्यासाठी 'कवच' ही अत्याधुनिक सुरक्षा प्रणाली आणल्याचा दावा रेल्वेमंत्र्यांनी केला होता. जर ही यंत्रणा कोरोमंडल आणि दुरांतो एक्स्प्रेसमध्ये राहिली असती तर आज इतक्या लोकांचे बळी गेले नसते. देशात रेल्वेने दररोज लाखो लोक प्रवास करतात. त्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी मानवी अथवा यांत्रिक बिघाडांमुळे होणारे अपघात कसे टाळता येतील यासाठी डॉ. अनिल काकोडकर आणि सॅम पित्रोदा यांच्या उच्चस्तरीय समितीने सुचवलेल्या शिफारशी स्वीकारल्या पाहिजेत.

पान १ वरुन

## नव्या शैक्षणिक धोरणाची ..

राष्ट्रीय धोरणाच्या तयारीचा आढावा व विद्यापीठाशी निगडित सामायिक विषयांवर यावेळी चर्चा झाली.

राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, देशातील विद्यापीठांच्या रँकिंग यादीत महाराष्ट्रातील केवळ दोन विद्यापीठांचा समावेश आहे. सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या रँकिंग यादीत येण्यासाठी सर्व विद्यापीठांनी आवश्यक गुणात्मक सुधारणा करावी, असे निर्देश त्यांनी दिले.राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल वेळेवर लागण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. विद्यार्थ्यांचे भवितव्य या निकालावर अवलंबून असते. ही जबाबदारी ओळखून वेळापत्रक गांभीर्यपूर्वक पाळावे. ई-समर्थ या डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर व्हावा. उद्योगांची गरज ओळखून नव्या संशोधनाला चालना द्यावी. संशोधन व विकास कक्ष महाविद्यालय स्तरावर कार्यान्वित व्हावेत. कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कौशल्य विकास व रोजगाराभिमुख शिक्षणावर भर द्यावा. डिजिटल इंडिया, स्टार्ट अप इंडियासारख्या उपक्रमांचा लाभ घ्यावा. गतिमान कार्यवाहीसाठी माहिती तंत्रज्ञान प्रभावीपणे वापरावे, असे निर्देश त्यांनी दिले.

केंद्र शासनाच्या योजना, सामाजिक उत्तरदायित्व निधीतून राबविलेल्या योजना, संशोधन प्रकल्प आदी विविध बाबींचा आढावा त्यांनी घेतला. यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू मधुसूदन पेन्ना, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. एस. आर. गडाख, गोंडवना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत सोकारे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उदय भोसले, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू विजय माहेश्वरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी, जिल्हाधिकारी निमा अरोरा आदी उपस्थित होते.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित कृषी प्रदर्शनाचा शुभारंभ राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते झाला. विद्यापीठातील ज्वारी, तेलबिया, कडधान्य, कापूस, गहू आदी पिकांबाबतचे संशोधन, उद्यानविद्या, कृषी विद्या, मृद विज्ञान, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी स्टॉलची राज्यपालांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधून कृषी संशोधनाबाबत माहिती घेतली. यावेळी कृषी मंत्री अब्दुल सत्तार, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, जिल्हाधिकारी निमा अरोरा, निवासी उपजिल्हाधिकारी शरद जावळे, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी आदी उपस्थित होते.

दरम्यान राज्यपाल रमेश बैस यांचे आज सकाळी साडेआठच्या सुमारास अकोला रेल्वे स्थानकात आगमन झाले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडे व जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौरभ कटीयार, पोलीस अधीक्षक संदिप घुगे,उपविभागीय अधिकारी शरद जावळे, रामेश्वर पुरी, मंडल रेल प्रबंधक धीरेंद्रसिंह, तहसिलदार सुनिल पाटील आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. बैस यांच्या आगमनानंतर पोलिस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.

# शासन आपल्या दारी लेखमालिका मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शहरी व ग्रामीण सुशिक्षित युवकांची वाढती संख्या, उद्योग व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेवून उद्योजकतेला चालना देणारी सर्वसमावेशक मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या नावाची महत्वाकांक्षी योजना सन २०१९-२० पासून राज्यात सुरू केली आहे. जिल्हा उद्योग केंद्र व खादी व ग्रामोद्योग मंडळ या कार्यालयामार्फत ही योजना राबविण्यात येत आहे.सदर योजना कायदेशीररित्या पात्र असणारे उत्पादन व सेवा उद्योग व्यवसायासाठी आहेत. या योजनेत कुठलेही स्थायी उत्पन्न नसलेले स्थानिक रहिवासी ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण, अधिकतम मर्यादा ४५ वर्ष, (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास प्रवर्ग/विमुक्त जाती व भटक्या जमाती/अल्पसंख्याक यांच्या साठी ५ वर्षे शिथिल) पात्र राहतील. सदर योजनेसाठी शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे रू. १० लाखांवरील प्रकल्पासाठी ७ वी उत्तीर्ण व रू. २५ लाखावरील प्रकल्पासाठी १० वी उत्तीर्ण अशी आहे. तसेच अर्जदाराने यापूर्वी शासनाच्या कोणत्याही अनुदानावर आधारित स्वयंरोजगार योजनेचा लाभ घेतलेला नसावा. (कोणत्याही योजनेत अनुदान घेतलेले नसावे.)




या योजनेत अर्जदारांना उत्पादन व्यवसायासाठी (उदा. बेकरी उत्पादन, पशुखाद्य निर्मिती, फॅब्रीकेशन इ.) रू. ५० लाख पर्यंतच्या प्रकल्पासाठी अर्ज करता येईल व सेवा उद्योग व्यवसायासाठी (उदा. सलून, रिपेरिंग व्यवसाय, ब्युटी पार्लर इ.) रू. २० लाखापर्यंत अर्ज करता येईल. या योजनेत अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती व भटक्या जमाती/अल्पसंख्याक या प्रवर्गातील अर्जदार शहरी भागासाठी बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्प किंमतीच्या २५% अनुदान व ग्रामीण भागासाठी ३५% अनुदानासाठी पात्र असेल. त्यासाठी त्यांना स्वगुंतवणूक ५% करावी लागेल. उर्वरित सर्व प्रवर्गातील अर्जदार हा शहरी भागासाठी १५% व ग्रामीण भागासाठी २५% अनुदानासाठी पात्र असेल. या लाभार्थ्यांना १०% स्वगुंतवणूक करावी लागेल.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराने maha-cmegp.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज सादर करावा. अर्ज करताना अर्जदारास स्वतःचा फोटो आधार कार्ड, अधिवास दाखला/शाळा सोडल्याचा दाखला/ जन्म दाखला, मार्कशीट, पॅन कार्ड, व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, जातीचा दाखला व वेबसाइटवरुन डाऊनलोड करुन पूर्ण भरलेले हमीपत्र (Undertaking Form) ही कागदपत्रे णश्रिरव करावी लागतात. तरी जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवती ज्यांना नवीन व्यवसाय सुरू करावयाचा आहे, त्यांनी वरील प्रमाणे संकेतस्थळावर अर्ज करावा किंवा योजनेबाबत सविस्तर माहिती घेण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र / खादी व ग्रामोद्योग मंडळ, होटगी रोड, किनारा हॉटेल समोर, सोलापूर येथे कार्यालयीन कामाचे दिवशी प्रत्यक्ष भेट द्यावी. तसेच सदर योजना राबविण्यासाठी या कार्यालयाकडून कोणत्याही खाजगी व्यक्तिची नेमणूक केलेली नाही व सदर योजनेचा लाभ घेण्यात आपली खाजगी व्यक्तीकडून फसवणूक झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त अर्जदारांनी सदर योजनेत भाग घ्यावा, असे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर यांनी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा उद्योग केंद्र, सोलापूर दूरध्वनी क्रमांक ०२१७-२६०५२३२ असून ई मेल आयडी didic.solapurmaharashtra.gov.in असा आहे

**- संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय ,सोलापूर**

## शेतकऱ्यांची नाहक अडवणूक..

अडचणी सोडवणारे अधिकारी बना व लोकांच्या दारावर योजना पोहोचविण्याची सवय अंगवळणी पाडा ,असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषी योजना, जलयुक्त शिवार योजना, जलजीवन योजना तसेच विविध आवास योजना अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आहेत. शेतकऱ्यांना शाश्वत ऊर्जा स्त्रोत निर्माण व्हावे त्यांना दिवसादेखील शेतीला पाणीपुरवठा करता यावा, यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना कार्यरत आहे. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून प्रत्येकाच्या शिवारात पाण्याचा साठा उपलब्ध व्हावा ही भूमिका आहे. पावसाच्या लहरीपणावर शाश्वत मात करण्यासाठी जलयुक्त शिवार आहे, हे लक्षात घ्या. जलजीवन मिशन अंतर्गत कोणत्याही गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी राहू नये असे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे या योजनेची देखील गंभीरतेने अंमलबजावणी करावी. केवळ पाणीपुरवठ्याचे सांगाडे उभे राहता कामा नये. तर विविध जाती घटकांसाठी असणाऱ्या आवास योजनांच्या माध्यमातून कायमस्वरूपी हक्काचा निवारा मिळावा, यासाठी शासन प्रयत्न करत आहे. याशिवाय मोठ्या संख्येने असणाऱ्या ओबीसी समाजाला मोदी आवास योजनेतून दहा लक्ष घरे देण्याची आमची तयारी आहे. या संदर्भातील आदेश लवकरच येतील. त्यापूर्वी ओबीसी प्रवर्गातील लाभार्थींचा शोध घेऊन ठेवा. विविध आवास योजनातून मोठया संख्येने निवारा देऊन कोणीही बेघर राहणार नाही. आवास योजनेसाठी पुढे लाभार्थीच मिळणार नाही. अशी स्थिती निर्माण करायची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राष्ट्रीयकृत बँकांच्या संदर्भात यावेळी काही तक्रारी बैठकीमध्ये करण्यात आल्या. कृषी कर्ज घेताना कोणत्याही कागदपत्राच्या कारणासाठी अडवणूक करू नका. या योजनाची अंमलबजावणी करताना केंद्र व राज्य शासनाचे धोरण स्पष्ट आहे. सीबिल पहाणे, जुने आहे म्हणून नवीन नाकारणे, कागदपत्रांचे कारणे पुढे आणणे चालणार नाही. काही राष्ट्रीयकृत बँका अशा पद्धतीने शेतकऱ्यांना उगीच त्रास देत असेल तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. बँकेच्या दारातून शेतकरी परत जाणार नाही याची खबरदारी घ्या, असा स्पष्ट इशाराही त्यांनी यावेळी दिला.

## पुणे-सातारा महामार्गावर दोन..

मध्यवर्ती दुभाजकावर आदळली. भरधाव वेगात असलेला कंटेनर सातारा लेनवर आदळून दुसऱ्या ट्रकला धडकला. कंटेनरच्या अचानक हालचालीमुळे ट्रक आणि राज्य परिवहनच्या शिवशाही बसची पाठोपाठ टक्कर झाली. अपघातानंतर महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी खळबळ उडाली. राजगड पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचार्यांसह बचाव पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमी व्यक्तींना जवळच्या रुग्णालयात पोहोचवलं मात्र यात दोघांनी जीव गमवला. या धडकेमुळे मुंबई-बंगळुरु महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली आणि दोन्ही मार्गे खोळंबली. बंगळुरु आणि मुंबईच्या दिशेने वाहनांची वाहतूक कोंडी पूर्ववत करण्यासाठी तीन तास प्रयत्न केले. नऊ वर्षीय ऋतुजा रवींद्र चव्हाण आणि खाजगी बसचा चालक शिवराज कुमार अशी मृत्यू झालेल्या दोघांची नावं आहेत तर रत्ना रवींद्र पुजारी (वय ३९ वर्षे), रवींद्र रामा पुजारी (वय ४१ वर्षे) ( दोघेही रा. ठाणे मुंबई ), विना प्रभाकर गौडा (वय ३४ वर्षे), ज्योती जयराम गौडा (वय ३९ वर्षे),पर्वतमा देवे गौडा (वय ४२ वर्षे), हेमा अण्णा गौडा (वय ३५ वर्षे) सर्व रा. मुंबई मिनाक्षी मायशेट्टी गौडा (वय ३५ वर्षे), संजू रवी गौडा, (वय २४ वर्षे), प्रदीप नज्जाप्पा गौडा (वय २५ वर्षे) अशी जखमींचे नावे असून दोघांची प्रकृती चिंताजनक आहे.


## चार दिवसानंतर राज्यातील ..

वाहतूक मंत्र्यांची बैठक बोलावली होती. ज्यात सर्वांचा सल्ला घेतला. ज्यात नवीन स्पीड अंतिम करण्यात आली आहे. तसेच याबाबत पुढील तीन चार दिवसांत आदेश काढण्यात येणार आहे. या आदेशात स्पीड वाढवण्यात आली आहे. पण यात दोन प्रकारचे मतं आहेत. ज्यात १४० किलोमीटरची स्पीड ठेवण्यास काहींचा विरोध आहे, तर काहींचा पाठींबा आहे. त्यामुळे यातील समन्वय साधून स्पीड ठरवण्यात आली आहे. यासाठी राज्य सरकारला दोन-तीन दिवसांत गॅझेट नोटिफिकेशन जाणार आहे. त्यानंतर राज्य सरकार सुधारित गॅझेट नोटिफिकेशन काढतील. यातून तुम्हाला दिलासा मिळणार असून, पण तो दिलासा काय असणार आहे हे आत्ताच सांगणार नसल्याचे गडकरी म्हणाले.

## परिवर्तनाच्या लढ्याला अभिजीत

यांचे कोणतेही वैयक्तिक भांडण नाही. केवळ मी कारखान्याकडे असणारे देणे देण्यासाठी लढाई लढत आहे.यामुळे तुमच्यासाठी उभा केलेल्या या लढ्याला मताच्या रूपाने यश मिळावे. अधोगतीकडे हा कारखाना घेऊन जात असलेल्या काळे यांना बाजूला सारून, कारखाना विठ्ठल प्रमाणे प्रगतीकडे घेऊन जाणारे अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाखालील उमेदवारांना विजयी करावे असे आवाहनही दिपक पवार यांनी केले आहे.या बैठकीमधे चेअरमन अभिजीत पाटील यांनीही कारखान्याची प्रगती होण्यासाठी लागणाऱ्या उपाय याबाबत माहीती दिली. विठ्ठलच्या निवडणुकीत तावशी या क्रांतिकारी गावामध्ये अखेरची सभा होऊन क्रांती घडली. त्याठीकाणी आपण जे शब्द दिले होते तो शब्द पूर्ण केला आहे. त्यामुळे त्यावेळी विठ्ठलचे चेअरमन नॉटरीचेबल अशी बदनामी होत होती. ती विठ्ठलचे बाबतीत घडवून आणली आहे. त्याचप्रमाणे आता सहकार शिरोमणी ची होत असलेली बदनामी थांबविण्यासाठी आमच्या उमेदवारांना विजयी करावे असे आवाहन अभिजीत पाटील यांनी केले आहे.यावेळी धोंडेवाडी येथील हनुमंत जालिंदर सावंत, अंकुश सावंत, छगन सावंत, महेंद्र सावंत, राजेंद्र सावंत, संजय ताटे, भगवान ताटे, पांडुरंग करडे, अजनसोंड येथील दिगंबर आप्पा डुबल, मारापूर येथील शंकर आसबे व यांच्यासह असंख्य सहकार्यांनी अभिजीत पाटील गटामध्ये जाहीर प्रवेश केला.

## महाविकास आघाडीमधील काँग्रेस-राष्ट्रवादी विश्वासार्ह नाहीत : प्रकाश आंबेडकर



लातूर : महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे सोडले तर काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे पक्ष विश्वासार्ह नाहीत असं म्हणत वंचितच्या प्रकाश आंबेडकरांनी थेट शरद पवारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहेत. प्रकाश आंबेडकर हे आज लातूरमध्ये बोलत होते. चंद्रशेखर राव यांच्या तेलंगणातील पार्टीचा महाराष्ट्रात शिरकाव होत असल्याचंही ते म्हणाले.

महाविकास आघाडीत वंचितच्या डॉ. प्रकार आंबेडकरांना शिवसेना फेवरेबल आहे मात्र काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून विरोध होत असल्याचं चित्र आहे. त्यावरुन आता प्रकाश आंबेडकरांनी हे वक्तव्यकेलं आहे. ते म्हणाले की, महाराष्ट्रामध्ये तेलंगणाच्या पक्षाचा शिरकाव होतोय. चंद्रशेखर राव यांच्या बीआरएसने राज्यात अनेक ठिकाणी सभा घेत आता नागपूरची सभेची तयारी केली. नऊ वर्षे जनतेच्या मनामध्ये राग आहे. तो राग मतात परावर्तीत करत मतदारांना आपल्याकडे खेचून घेण्यासाठी प्रयत्न होतोय. उद्धव ठाकरे जर सोडले तर महाविकास आघाडीतील दोन पक्षाची विश्वासार्हता काय आहे हे सर्वांना माहीत आहे. आम्ही त्यांच्याबरोबर जाणार होतो, मात्र जागावाटपात किती जागा मिळणार हे अद्याप स्पष्ट होत नाही. तिन्ही पक्षांनी त्याचं काय ठरलं असेल तर ते स्पष्ट करावं.

भाजपा जातीय ध्रुवीकरण करत असल्याचा आरोप प्रकाश आंबेडकरांनी केला आहे. मुस्लिम समाजाने नऊ वर्षे जे सोसले आहेत ते आणखीन सहा महिने सोसावं, जातीय सलोखा बिघडू नये असं काम करावं. देशात कर्नाटकसारखा निकाल येऊ शकतो. असे मत प्रकाश आंबेडकर यांनी लातूर येथील पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, हिजाब, लव्ह जिहाद सारखे बारा तेरा प्रकरण मागील काही दिवसात काढण्यात आली आहेत. असे अनेक प्रकार भविष्यात ही केले जातील. हे जातीय तेढ निर्माण करणारे आहे. मुस्लिम समाजाने नऊ वर्ष हे पाहिले आहे, आणखीन सहा-सात महिने पाहा. जातीय सलोखा कायम राखत एकत्र आल्यास कर्नाटकसारखे देशात सत्ता परिवर्तन होऊ शकते. भाजप आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समोरील अजेंडे संपले आहेत. त्यामुळं आता समाजात भीती निर्माण करणे आणि जातीय ध्रुवीकरण करत पुन्हा सत्तेवर येण्यासाठी धडपड चालू असल्याचे वक्तव्य वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केलं.

# 'प्रेम उठाव' हा वाचनीय काव्यसंग्रह आपण जरूर वाचा

✻ पुस्तक परीक्षण लेखक ✻
दीप साहित्यिक १२३ मुरबाड/ ठाणे दीपक आंबटकर

जीवनसंघर्षकार नवनाथजी रणखांबे यांचे प्रेम उठाव हा दुसरा काव्यसंग्रह ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. सतीश खोत यांनी काढलेले अतिशय सुंदर मुखपृष्ठ या पुस्तकाचे असून या पुस्तकाला प्रेम उठाव हे समर्पक शिर्षक दिले आहे. आपल्याला प्रश्न पडला असेल की ङजतए ते प्रेम का ???



या पुस्तकात ते प्रेम तर आहेच ; शिवाय जी प्रेमाची आणि मायेची व्याख्या असते. प्रेम म्हणजे प्रेम कुठलं , कशाचं आणि कश्यावरही...सरांच्या काव्यसंग्रहाबद्दल दोन शब्दच......

कवी नवनाथजी रणखांबे सदरहू पुस्तकात ( पान नंबर २८ ) मी आणि माझी कविता या मनोगतातून लिहितात , --

एकमेकांवर प्रेम करणे म्हणजे नैसर्गिक बाब आहे. प्रेमात आंतरधर्मीय आणि जातीय जोडपी पळून जावून केलेले लग्न म्हणजे प्रेम उठाव होत नाही तर प्रेम उठाव ही संकल्पना अमर्यात आहे. मग प्रेम उठाव म्हणजे काय ? माझ्या मते, प्रेम उठाव म्हणजे मानवांच्या प्रेमाच्या विविध रंग छटा अबोला, विरह, सुख ,दुःख , दगा इ. घालमेल व्यक्त करून प्रेमासाठी केलेला उठाव म्हणजे प्रेम उठाव होय.

सर पुढे कवितेत असे लिहितात
प्रत्येकाच्या आयुष्यात
प्रेम होतं असतं
प्रत्येकाच्या तारुण्यात
कोणीतरी खास असतं **(पान नंबर २९)**
हे LOVE बद्दल म्हटले आहे.
तर पुढे एका कवितेत , ----
हृदयाने माझ्या
खूपच साठवले
लेखणीला माझ्या
थोडच आठववले **( पान नंबर ३१)**

असे थोडे आणि सुंदर आठवले सर्व प्रकारचे प्रेम या ग्रंथात मांडले आहे. साखळदंड ही अतिशय सुंदर अशी कविता आहे.

उपेक्षित , शोषित ,पिडीत
बहिष्कृत जखमांचं दंश सुरू आहे आजपर्यंत
मोठ्या थाटामाटात......!
वासनागंध हिंस्त्र श्वापदांचे रक्त रंजित
मुळ खुटलं नाही जात! **(पान नंबर ४१ )**
तर पुस्तकातील खुणा या कवितेत म्हणतात , ----
जेंव्हा जेंव्हा पाहतो
ह्या जुनाट खुणा
तेंव्हा तेंव्हाच का
भळभळत राहतात
ह्या जखमा ?**(पान नंबर ४३ )**

सुंदर वाचनीय असा काव्यसंग्रह नवनाथजी रणखांबे यांचा प्रकाशित झालेला आहे. तो जरूर वाचा. सर्व प्रकारचे प्रेम माया , ममता आपल्या लेखणीतून त्यांनी उतरवले आहे.

मुखपृष्ठ अतिशय सुंदर आहे. साखळदंडाने प्रेमाचे कलम बांधलेलं आहे. प्रेमाचे कबुतर आणि दिल ही प्रतीके आहेत . मागे पृष्ठ भागावर त्यांची कविता आहे ते म्हणतात , ---

मन तुझ्यासाठी
माझे रोज झुरायचे
प्रेमात भेटीसाठी
तुझ्या वाटेवर फिरायचे

हा वाचनीय काव्यसंग्रह आपण जरूर वाचा . कवी कडून हा काव्यसंग्रह घेऊन संग्रही ठेवा .

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# साईबाबा एम्प्लॉईज संचालक मंडळ सदस्य १७ कशाला ? वाढीस विरोध

## संचालक विठ्ठल पवार यांची हरकत ; सहकार आयुक्तांना निवेदन

शिर्डी/प्रतिनिधी : श्री साईबाबा एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीच्या प्रस्तावित व्यवस्थापन कमिटी सदस्य वाढीव प्रस्तावावर आमची हरकत असून नमूना ई-२ प्रमाणे ७ फेब्रुवारी २०२२ रोजी सादर केलेल्या कागदपत्रांप्रमाणे कमिटी संख्या फक्त ११ आहे. मग १७ संचालक कशाला? असा प्रश्न उपस्थित करून मागील संख्येप्रमाणे संस्थेची निवडणूक घ्यावी. वाढीचा ऐनवेळच्या विषयात घेऊ नये, असे निवेदन श्री साईबाबा संस्थान एम्प्लॉईज सोसायटीचे संचालक विठ्ठल पवार यांनी विभागीय सहकार आयुक्त तसेच जिल्हा उपनिबंधक व राहाता तालुका सहाय्यक निबंधक यांना दिले आहे.निवेदनात म्हटले आहे की, साईबाबा संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांची पतसंस्था आहे. हेच कायम कर्मचारी संस्थेचे सभासद आहेत. संस्थेच्या संचालक मंडळाची मुदत ऑगस्ट २०२२ मध्ये संपुष्टात आली आहे. वास्तविक मुदत समाप्तीनंतर संस्थेवर कारभार बघण्यासाठी प्रशासकाची

नेमणूक व्हायला हवी. मात्र, संचालक मंडळच कारभार पाहात आहे. हे मंडळ त्यानुसारच २०१७ काळजीवाहू असून मंडळाला धोरणात्मक मध्ये निवडणूक निर्णय घेता येत नाहीत. पद व अधिकारांचा झाली. संचालक गौरवापर करुन चुकीच्या पद्धतीने सध्याच्या मंडळाने ५ वर्षांत संचालक मंडळाने दि. ११ जून २०२३ एकाही वार्षिक रोजी विशेष सर्व साधारण सभेचे आयोजन सभेत केले आहे. यात संचालक मंडळ सदस्य वाढीबाबत पोटनियम दुरुस्तीचा प्रस्ताव आणता ठेवला आहे. प्रत्यक्षात याबाबत महाराष्ट्र म द त सहकारी कायदा १९६० मधील कलम ७६ नुसार २५ टक्के सदस्यांनी लेखी मागणी करणे आवश्यक आहे. अनेक सभासदांच्या याकामी इच्छेविरुध्द सह्या घेतल्याचा आरोपही पवार यांनी निवेदनात केला आहे. आहे. ३१ मे च्या मासिक सभेत हा विषय पत्रिकेत नव्हता, त्यामुळे विशेष सभेच्या वेळी ऐनवेळच्या विषयात हा विषय घेतला जाण्याची शक्यता आहे. सन २००९ पूर्वी संस्थेची सभासद संख्या अडीच हजारांच्या दरम्यान होती. त्यावेळी १७ सदस्यांची कमिटी कार्यरत होती. शासनाचे ९७ व्या घटना दुरुस्तीनंतर संचालकांची संख्या आहे.

११ करण्यात आली. हा प्रस्ताव न संपल्यानंतर घाईघाईने शालेय साहित्य वाटप समारंभ व विशेष सर्वसाधारण सभा एकाच वेळी घेण्याचे कारण काय? सभा कागदोपत्रीच दाखविण्याचे हे पूर्व नियोजन महिला संचालक वाढविण्याची तसदी या संचालक मंडळाने का घेतली नाही, असा सवालही पवार यांनी उपस्थित करुन कमिटी सदस्य संख्या वाढीस विरोध केला आहे. ही निवडणुक पूर्वीच्या कमिटी सदस्य संख्येप्रमाणे घेण्याची मागणी पवार यांनी सहकार आयुक्त व यंत्रणेकडे केली



# किरनळी येथे ६ कोटी ३७ लाख कामाचे भूमिपूजन मिलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न

## सात्विक सतीश कणमुसे यांच्या प्रथम वाढदिवसा निमित्त विविध विकास कामाचे भूमिपूजन

अक्कलकोट/प्रतिनिधी : किरनळी ता अक्कलकोट येथे सरपंच सौ. महानंदा कणमुसे यांचे नातू सात्विक सतीश कणमुसे यांच्या प्रथम वाढदिवसा निमित्त किरनळी येथे ६ कोटी ३७ लाखाच्या विविध विकास कामाचे भूमिपूजन अक्कलकोटचे रॉयल नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी यांच्या शुभ हस्ते करण्यात आले ,कार्यक्रम अध्यक्षस्थानी सरपंच महानंदा कणमुसे हे होत्याकार्यक्रमास प्रमुख उपस्थिती भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, उपसरपंच अरविंद भांगे, शेळके प्रशाला चेअरमन बसवराज शेळके, जेष्ठ भाजपा नेते श्रीशैल काका ठोंबरे, अप्पासाहेब बिराजदार, कल्याणराव बिराजदार, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, उपअभियंता बेंबळगी, ठेकेदार अंकुश राजपूत, बोरगाव सरपंच शाम स्वामी , सिध्दु किवडे, घोळसगांव सरपंच राजेंद्र कीवडे, शशी पाटील, अप्पासाहेब किवडे, सचिन घुगरे, स्वामीनाथ शिदोरे, दत्ता व्होदलूरे, संतोष पोमजी, सुनील सावंत, शाम बाबर, शिवानंद पटणे, महादेव सोनकवडे,दयानंद कुंभार, धोडप्पा मुलगे, बोलेगाव सरपंच विलास पाटील, अंगद जाधव आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते

यावेळी बोलताना श्रीशैल ठोंबरे म्हणाले की, इतिहासात पहिल्यांदा किरनळी गावास येवढे मोठ्या प्रमाणात निधी आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून मिळाले आहे, गावाचे सरपंच महानंदा कणमुसे ताई व सतीश कणमुसे यांच्या प्रयत्नाने गावाचे विकास कामाला चालना मिळत आहे आपल्या भागातील वीज समस्या मोठी होती ते समस्या आज सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्यामुळे मिटले आहे त्यामुळे आज शेतकरी सुखात आहेत, लाईट वेळेवर आठ दहा तास मिळत आल्याने शेतकऱ्याचे अडचण गेलेले आहे, भुरिकवठे किरनळी व किरनळी घोळसगाव रस्त्याचे कामाचे भूमिपूजन झाले आहे त्यामुळे येणाऱ्या काळात लोकांना प्रवास करण्यास सोयीस्कर होईल. पंतप्रधान मोदी साहेब संकप्लेतुन हर घर नळ .हर घर जल योजनेतून पाणी पुरवठा व विविध कामाचे भूमिपूजन ही करण्यात आले त्यामुळे गावातील पाणी समस्या मिटणार आहे व मुस्लिम, धनगर लिंगायत, मागासवर्गीय समाजामध्ये सिमेंट कॉंक्रिट रस्ता, पेव्हर ब्लॉक, बंदिस्त गटार, सभागृह हे काम होत आहेत त्यामुळे गावाची प्रगती होणार आहे

यावेळी सरपंच सौ. महानंदा कणमुसे यांचे नातू सात्विक सतीश कणमुसे यांच्या प्रथम वाढदिवस व सचिन दादा कल्याणशेट्टी यांचे कट्टर समर्थक असलम मुल्ला याचे वाढदिवस मिलन दादा कल्याणशेट्टी व मान्यवरांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आले,

यावेळी किरनळी गावाचे श्री अनिल अर्जुन भंडारे भूमिपुत्र गेल्या ३७ वर्ष रेल्वे उपनिरिक्षक सेवेत निष्कलंक कार्य करून सेवा निवृत्त झाल्याबद्दल किरनळी ग्रामपंचायत व ग्रामस्थ वतीने जंगी सत्कार करण्यात आले

यावेळी ग्रामपंचायत सदस्य शाम सोनकांबळे, शशी कोळी, पद्माकर भंडारे, ग्रामविकास अधिकारी शिवपुत्र ढोपरे, ग्रामविकास अधिकारी राजू कणमुसे, भाजपा जेष्ठ नेते रेवप्पा कणमुसे, चंद्रशेखर कणमुसे, श्रीशैल कणमुसे, चंद्रकांत हुलगणे, महेश कणमुसे, उमाकांत गुमते,साहेबलाल सुभेदार, सायबांना भांगे, अरुण भंडारे, सुभाष भंडारे, सायबा सोनंकाबले, धनराज धेबडे, मकबूल कणमुसे, पंकज सुतार, गिरीश कणमुसे, कर्मचारी दीपक भांगे, विनोद सोनकांबळे, आदीनी परिश्रम घेतले कार्यक्रम सूत्रसंचालन प्रा. शिवाजी गायकवाड यांनी केले आभार प्रा. कलाकार सोनकांबळे यांनी मानले

# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्षपदी शरणपा गायकवाड यांची निवडं

सोलापूर/प्रतिनिधीः रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व रिपब्लिकन अल्पसंख्यांक विभाग सोलापूर शाखेची तातडीची बैठक सोलापूर येथील संपर्क कार्यालयात घेण्यात आली



या बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रदेश अध्यक्ष सबोध वाघमोडे हे होते.या बैठकीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्षपदी श्री शरणप्पा गायकवाड यांची निवड करण्यात आली निवडीचे पत्र सुबोध वाघमोडे यांच्या हस्ते देण्यात येऊन पुष्प गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला या वेळी रिपाईचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष जाक्कापा कांबळे माणिक आठवले मारुती सोनवले अल्पसंख्यांक शहर युवक अध्यक्ष शिकांदर शेख इम्रान शेख इब्राहिम शेख दत्ता कांबळे पूनम मोरे अरुणा सरवदे समीर मुजावर सादिक शेख धर्मा माने राव साहेब परीक्षाळे श्रीमंत गायकवाड रफिक शेख नसरीन शेख आमीना शेख आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

# टाकळीवाडीचे सुपुत्र गणपती खोत पी.एस.आय पदावरून सेवानिवृत्त झाल्याबद्दल गावामधून भव्य जंगी मिरवणूक

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे :टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गणपती बंडू खोत यांचे शिक्षण दहावी झाले. अतिशय खडतर प्रवास करून त्यांनी नोकरी मिळवली. १ली ते ९ वी पर्यंत ते दत्तवाड तालुका शिरोळ येथील शाळेमध्ये पायी अनवाणी चालत जाऊन त्यांनी शिक्षण पूर्ण केले. टाकळीवाडी सारख्या साध्या खेड्या गावातून पी.एस.आय. पर्यंत त्यांनी मजल मारली. पूर्वी गावामध्ये पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. परिस्थितीवर मात करत अतिशय जिद्दीने त्यांनी महाराष्ट्र पोलीस मध्ये रुजू झाले. टाकळीवाडी ते दत्तवाड हा ४ किलोमीटरचा रस्ता अतिशय पूर्णपणे खराब झालेला होता. गुडघाभर रस्त्यात खड्डे होते. पावसाळ्यात तर अतिशय परिस्थिती वाईट होती. रस्त्यामधील खड्ड्यांमध्ये पाणी साचलेले असायचे. खड्ड्यातूनच चालत जाऊन शाळा गाठायची.



परिस्थिती अतिशय हलाखीची असल्यामुळे अंगावर शाळेचा गणवेश सुद्धा मिळायचा नाही. फाटके तुटके शर्ट असायचे. शर्टला बटणे नसायची.पावसाळ्यात अंगावर एखादे गोणपाट घेऊन आपले कसेबसे दप्तर न भिजवता ती शाळा गाठावायचे. हिवाळ्यात अंगावर स्वेटर सुद्धा मिळायचे नाही. अशा परिस्थितीत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पाटी, पेन्सिल, आणायला पैसे नसायचे शनिवारी रविवारी ते इतरांच्या शेतामध्ये कामाला जाऊन पैसे गोळा करायचे व त्यातून आपले शिक्षणाचे सर्व साहित्य घ्यायचे.


देशासाठी काहीतरी करावे हे सारखे मनात त्यांच्या रुजत होते. ते दोन वेळा भारतीय सेना मध्ये भरती सुद्धा झाले. परंतु घरच्या परिस्थितीमुळे ते जाऊ शकले नाहीत. अशा परिस्थितीत ते १९८४ यावर्षी कोल्हापूर येथे महाराष्ट्र पोलीस दलात भरती झाले. यांचे ट्रेनिंग पुणे येथील रामटेकडी येथे १३ महिने पूर्ण केले.ट्रेनिंग नंतर त्यांना पहिलं पोलीस स्टेशन दौंड पुणे येथे मिळाले. दौंड पुणे ते २० वर्षे त्यांनी सेवा करून त्यांची बदली रत्नागिरी येथे ४ वर्षे त्यांनी सेवा केली. त्यानंतर १५ वर्षे त्यांनी कोल्हापुरात आपली सेवा बजावली. हवालदार या पदानंतर त्यांची पी.एस.आय पदी निवड झाली.ते महाराष्ट्र बरोबर बिहार, गुजरात ,पंजाब ,गडचिरोली ,आदी राज्यात सुद्धा त्यांनी सेवा बजावली.

त्यांची ३१ मे २०२३ रोजी पी.एस.आय पदावरून ३९ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त झाले. त्यांची गावांमधून भव्य जंगी मिरवणूक काढण्यात आली.आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांचे चिरंजीव मा.अजय राजेंद्र पाटील यांनी सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावकऱ्यांनी त्यांचे अतिशय उत्साहात मिरवणूक काढली. फेटे बांधून समस्त गावकरी व गावातील सर्व तरुण मंडळे तसेच महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांनी चौका चौकात डिजिटल बोर्ड लावून त्यांना शुभेच्छा दिल्या.सैनिक असोसिएशन चे सर्व आजी-माजी सैनिक उपस्थित होते.

# कलम ३७० रद्द केले तेव्हा केजरीवाल कुठे होते? : ओमर

राजौरी : जम्मू-काश्मीरला विशेषाधिकार देणारे कलम ३७० रद्द करण्यात आले तेव्हा अरविंद केजरीवाल कुठे होते?, असा सवाल नॅशनल कॉन्फरन्सचे नेते आणि जम्मूकाश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शनिवारी केला. राजौरी येथे बोलताना ओमर म्हणाले की, केंद्र सरकारने दिल्ली सरकारविरोधात अध्यादेश काढला आहे. त्यामुळे आता दिल्लीचे मुख्यमंत्री केंद्र सरकारविरोधात अन्य राजकीय पक्षांचा पाठिंबा मागत फिरत आहेत.

# शब्दकोडे क्र २६




आडवे शब्द १.दार,कवाड,द्वार ३.नव्यानेच आलेला ५.आझाद हिंद सेनेची घोषणा ९.जाडा,भारदस्त १०.हिंदीत ओठ,अधर ११.नवऱ्याचा भाऊ १२.लहान मुल,बालक १३.त्रास,कष्ट १५.संगीतातील सात स्वर १६.हार,माळ १७.उघडी,काहीही न नेसलेली १८.पसंद,रस १९.हव्यासी,जास्त हाव असलेला २०.चंद्राचा सोळावा भाग २१.रतीपती २२.माज,रग २३.ज्याला यश नाही असा २४.दया,करूणा २५.गाजावाजा,बोभाटा २८.व्यसन,लत २९.गृहीत धरने या अर्थी ३०.खंडोबाला वाहीलेले स्त्री पुरूष ३२.तरू,वृक्ष ३३.वरचेवर,वरकरणी ३५.भकास,उनाड ३६.कठीण ३९.नरम च्या विरूध्द ४१.आवड,फळातील द्रव भाग ४२.भास्कराचार्यांचा गणितशास्त्रावरील प्रसिध्द ग्रंथ ४३.विनंती,आर्जव ४६.जंगल,अरण्य ४८.दिवस,आघात ४९.जू ५१.सैन्याचा दाणागोटा ५४.फासा,पिंजरा ५६.कब्जा ५७.आवरण,सालपट ५९.गाडीवरील आच्छादन ६१.उणे,कमी करणे ६२.मोठे वादय ६३.वाचा ६४.बांग्लादेशाचे चलन ६६.मासा पकडण्याचा आकडा ६७.उष्ण,कोमट ६८.भार,ओझे ७०.भांडण ७२.एक स्वयंप्रकाशीत किटक ७३.तारा,नक्षत्र ७५.एक मौल्यवान लाकुड ७६.उणीव,ददात ७७.लाज,लज्जा ७८.जखमेवर लावण्याचे स्निग्ध औषध

उभे शब्द १.राजसभा भरण्याचे ठिकाण २.दावा दाखल करणारा,चाबुकाची लांब चामडी पटटी ३.रोख,पैसे देऊन ४.महल,प्रासाद ५.मारून मुटकून,इच्छा नसताना ६.भारताच्या दक्षिणेकडील एक भव्य सागर ७.प्रत्येक,हर,भाव ८.विस्तीर्ण,पसरलेले ९.हिंदीत छायाचित्र १०.बाळाला दिला जाणारा डोस १३.लाग,दम,धीर १४.फळाचे वरील संरक्षक कातडे २०.कपटी म्हणला की त्याच्या मनात --- हे आलेच २३.अलि,वात्रट २६.गवळी चे ग गाळा २७.सुताराचे लाकुड तासण्याचे एक हत्यार २९.पक्का रस्ता,संजय दत्त-पुजा भटट यांचा एक प्रसिध्द चित्रपट ३०.संपत्तीचा हक्कदार ३१.मुरली धारण केलेला ३४.नवरा मुलगा ३५.ओतुन तयार केलेले ३७.ख्रिश्चन धर्मपरिचारीका ३८.फटीतून आत येणारा प्रकाश ४०.उतरण,टेकडीची उतरण ४४.आईचे किंवा वडीलांचें वडील ४७.आश्चर्य ४८.लहान मुलांच्या पायात घालावयाचा एक अलंकार,'पार्वतीच्या बाळा तुझया पायात --' एक श्रीगणेश गीत ५०.कोलकात्याचे एक विमानतळ ५२.सटवाई ५३.दार,कवाड ५५.पिकलेला ५६.तवाना,टवटवीत ५८.केस विंचरण्याचा लहान आणि बारीक कंगवा ६०.लवकर,जलद ६१.अंगावर मारल्याची खुण ६२.उदयानंतरचा दिवस ६५.कर्म,काज ६७.वादयांचा आवाज ६८.मांजराचा जोडीदार ७१.कविता करणारा ७२.दुभत्या गाईची ओटी ७३.धातुचे सूत ७४.एक विदेशी दारू ७५.सन,शके

# जिथे आई-वडिलांचं नाव असतं तिथं त्यांचे आर्शीवाद हि असतातच : डॉ.कासेगावकर

वैराग/प्रतिनिधीः आई-वडिलांच्या आशीर्वादापेक्षा मोठ्ठी गोष्ट काही नसते .जिथे आई-वडिलांचं नाव असतं तिथं आई-वडिलांचे आशीर्वाद असतातच .बार्शी आणि सोलापूर पेक्षाही चांगलं आप्पाई हॉस्पिटल असून हे वैराकरांचे भाग्य आहे .डॉ . रोहन खुपसरे यांच्या प्रगतीचा आम्ही साक्षीदार बनलो ही एक मोठी भाग्याची गोष्ट आहे.




असे गौरवोद्गार सोलापूरचे प्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ डॉ.प्रसन्न कासेगावकर यांनी व्यक्त केले.वैराग (ता.बार्शी ) येथे आप्पाई बाल रुग्णालयाच्या नविन इमारतीचे उद्घाटन ८ जुन रोजी सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . त्या प्रसंगी ते बोलत होते .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सोलापूरच्या विकास सहकारी बँकेचे मुख्य व्यवस्थापक पांडुरंग मंत्री हे होते .आप्पाई रुणालय ही वास्तु नसून हे वैदयकिय क्षेत्रात विश्वास कमवल्याचे प्रतीक आहे . असे मत प्रसिद्ध बाल रोगतज्ञ डॉ.अतुल कुलकर्णी यांनी याप्रसंगी बोलताना व्यक्त केले. गेल्या दहा वर्षापासून मी रुग्ण सेवा करित आहे.वैराग भागातील लोकांच्या आरोग्याचा विचार लक्षात घेऊन ४० बेडचे सुसज्ज रुणालयात उभारले असून आजचा हा दिवस आनंदाचा आणि स्वप्नपूर्तीचा आहे असे मत डॉ.रोहन खूपसरे यांनी आपल्या प्रास्ताविकात बोलताना व्यक्त केले. यावेळी डॉ.हेमंत साळवे,डॉ.सचिन पाटील, डॉ .जयवंत गुंड, डॉ.प्रवीण गुंड,डॉ.शितल बोराडे,डॉ .संताजी घोरपडे,प्रशासकिय अधिकारी रवींद्र माने ,नगरसेविका तृप्ती भूमकर,डॉ.सई गुंड ,जयशंकर खुपसरे,अँड.मिलींद खुपसरे,भुषण भुमकर,डॉ.जिवन बारबोले,सुरेश देशमुख, राहूल साखरे, सुभाष शेंडे, वैदयकिय क्षेत्रातिल मान्यवर, वैराग मधील वकिल, राजकिय, सामाजीक क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते. डॉ.माधुरी खुपसरे यांनी उपस्थितांचे आभार मानले .

पोळासाठी देण्यात येणाऱ्या १००रुपये हप्ताचे शेतकऱ्यांना लागवडीसाठी आताच होणार वाटप...

# श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा मिल रोलर पूजन समारंभ संपन्न

दैनिक लोक सह्याद्री

पंढरपूर/प्रतिनिधी :सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. यामध्ये ऊस बिलाचा मुद्दा चांगलाच गाजत असतानाच,विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी मात्र श्रीविठ्ठल कारखान्याकडून पोळ्यासाठी वाटप करण्यात येणारा १००रुपयाचा हप्ताचे शेतकऱ्यांसाठी लागवडीसाठी हप्ता आताच वाटण्यासाठी सुरुवात करण्यात येणार आहे. यामुळे ऐन निवडणुकीतील वाटप चेअरमन कल्याणराव काळे यांना अडचणीचे ठरणार आहे.पंढरपूर तालुक्यात होत असलेल्या या निवडणुकीत मोठी राजकीय चर्चा होत असताना, एकीकडे अभिजीत पाटील यांनी मात्र श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यामध्ये आलेल्या उसासाठी पूर्वी २३०० रुपये जमा केले आहेत. पोळ्यासाठी आणि दीपावली साठी १००प्रमाणे वाटप करून आश्वासन दिल्याप्रमाणे २५००रुपये जमा होणार आहेत. हा १०० रुपयेच दुसरा हप्ता आताच मिळणार असून त्याची सुरुवात काळे यांचा बालेकिल्ला असलेल्या भाळवणी गटातून होणार आहे. यामुळे विठ्ठल परिवारात मोठी चर्चा सुरू झाली आहे.एकीकडे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे ऊस बिल दिले नसल्याने शेतकऱ्यात तीव्र नाराजी असताना, मात्र अभिजीत पाटील यांनी मोठा मास्टर टोक करत, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना सात ७लाख २६हजार गाळप केलेल्या टनाचे दुसरा हप्ता म्हणून १००रुपये आज शेतकऱ्यास जाहीर केले आहे.श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे आज गळीत हंगामाचे रोलर पूजन हभप माधव महाराज नामदास (संत नामदेव महाराज यांचे सोळावे वंशज) व कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत धनंजय पाटील, व्हाईस चेअरमन प्रेमलाताई रोंगे, स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी रोंगे सर, युवा नेते दीपक पवार यांच्या उपस्थित संपन्न झाला....यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे सर्व संचालक मंडळ तसेच शेतकरी सभासद, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बार्टी तर्फे संविधान दिंडीच्या माध्यमातून महाराष्ट्रभर संविधानाचा जागर

सोलापूर/प्रतिनिधीः सचिव सुमंतजी भांगे ( सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन ) यांच्या मुख्य संकल्पनेतुन व आयुक्त प्रशांतजी नारनवरे (समाज कल्याण विभाग) व महासंचालक सुनीलजी वारे (बार्टी) यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी,पुणे यांचेमार्फत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याबरोबर यावर्षी ही संविधान दिंडी चे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील आराध्य दैवत संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे प्रस्थान आषाढी वारीस शनिवारपासून सुरुवात होत आहे. देहू आळंदीत राज्याच्या कानाकोपऱ्यातून दिंड्या दाखल होत आहेत. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा शनिवारी दुपारी दोन वाजता पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. या अनुषंगाने बार्टीचा संविधान रथ ही सज्ज झाले आहे. आषाढी वारी पालखी सोहळ्यात यंदा वारकऱ्यांचा - प्रचंड उत्साह दिसून येत आहे. गेल्या तीन दिवसांपासून देहू-आळंदी नगरीतील वातावरण भक्तिमय झाले आहे. शनिवारी तुकोबारायांचा पालखी सोहळा असल्याने शुक्रवारी सायंकाळी दिंडेकरी, फडकरी, सेवेकरी देहू नगरीत माउलीच्या सोहळ्यासाठी सजली आहे. देहू येथून संत तुकाराम महाराज पालखी सोहळा शनिवारी प्रस्थान ठेवणार आहे. त्यासाठी राज्यभरातून दिंड्या देहू येथे दाखल होत आहेत. देहूमध्ये भक्तांचा मेळा भरल्याचे चित्र दिसत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पायी वारी पालखीचे रविवारी सायंकाळी चार वाजता आळंदीतून प्रस्थान ठेवणार आहे. राज्यभरातून वारकऱ्यांच्या दिड्या आळंदीत दाखल होऊ लागल्या आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी नगर परिषद प्रशासन, पोलिस प्रशासन व आरोग्य विभागाने जय्यत तयारी केली आहे.




बार्टीकडून पालखी सोहळ्यात संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येते 'बार्टी'कडून पालखी सोहळ्यात संविधानविषयक प्रबोधन करण्यासाठी संविधान रथ सजविण्यात येते सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संविधान दिंडीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

वारकरी बांधवांना भारतीय संविधानाची माहिती व्हावी, आपले अधिकार, कर्तव्याची जाणीव व्हावी तसेच संतांच्या समतावादी विचारांचा प्रसार व्हावा हा या संविधान दिंडीचा हेतू आहे. भारतीय संविधानाबद्दल तीन प्रश्न विचारून विजेत्यांना भारतीय संविधानाची प्रत, संविधान प्रास्ताविका भेट देऊन सन्मानित करण्यात येत आहे. वारकरी बांधवांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाटप करून त्यांना भारतीय संविधानाबद्दल आपल्या मूलभूत अधिकार व कर्तव्याची माहिती देण्यात येत आहे.वारकरी बांधव व नागरिकांना संविधानाच्या प्रास्ताविकाचे व बार्टी घडी पत्रिकेचे वाटप करून संविधान दिंडीचे महत्त्व विशद करण्यात येते. संविधान चित्ररथास वारकऱ्यांचा आणि नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असतो. वारकरी दिंडी च्या मार्गाने वारकऱ्यांच्या विसाव्या ठिकाणी प्रबोधनात्मक, संविधान आधारित विविध उपक्रम, कार्यक्रम, शाहीरी जलसा यांचे आयोजन करण्यात येते. संविधान दिंडीमध्ये बार्टीचे निबंधक इंदिरा आस्वार,विभाग प्रमुख श्रीमती स्नेहल भोसले,विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण, विभाग प्रमुख श्री. रवींद्र कदम ,विभाग प्रमुख, आरती भोसले, विभाग प्रमुख सतीश पाटील, विभाग प्रमुख अनिल कारंडे, कार्यालयीन अधीक्षक सचिन जगदाळे,सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी, प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे व मनोज खंडारे, तेजस्वी सोनवणे विशाखा सहारे, उषा भिंगारे तसेच इतर प्रकल्प अधिकारी व समतादूत यांचा समावेश आहे

# सर्व जाती धर्मांना सामावून घेऊन तालुक्याचा चौफेर विकास करणारा आमदार म्हणजे सचिन कल्याणशेट्टी : नामदेव काळे



अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : येथील जननायक कै. पंचप्पा कल्याणशेट्टी सर हे दूरदृष्टीचे एक अभ्यासू नेतृत्व होते. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून सर्व जाती धर्मांना सामावून घेऊन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी तालुक्याचा चौफेर विकास करीत असल्याचे स्वातंत्र्याचे माजी सरपंच नामदेव काळे बोलत होते.

ते सातन दुधनी येथे जन सुविधा योजनेअंतर्गत वीस लाख रुपये किमतीचे अंतर्गत काँक्रीट रस्त्याचे भूमिपूजन प्रसंगी माजी सरपंच नामदेव काळे बोलत होते.पुढे बोलताना माझी सरपंच काळे म्हणाले गेल्या ५० वर्षात इतका विकास झालेला नाही ते आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी हजारो कोटींची निधी आणून सातन दुधनी सह तालुक्याचा चौक फेर विकास करीत आहेत हे सर्वसामान्यांसाठी समाधानकारक काम असल्याचे काळे बोलत होते.याप्रसंगी विद्यमान सरपंच विठ्ठल खताळ भाजपा युवा मोर्चाचे रमेश सोलंकर महेश पाटील कोनपा शिंदे राजेश पांढरे सिद्धाराम देवकते माणिकराव कुलकर्णी अर्जुन जानकर आदी उपस्थित होते.

# भारतातील पहिली असलेली आजिबाईंच्या शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, ठाणे जिल्हाचा स्तुत्य उपक्रम

ठाणे/मिलिंद जाधव : आजीबाईंच्या शिक्षणाचा पाया अधिक मजबूत व्हावा त्यांच्यापासून इतर महिलांनी धडा घ्यावा आणि आपली शैक्षणिक प्रगती करावी या हेतूने महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ ,मुंबई शाखा ठाणे जिल्हाच्या वतीने जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांच्या संकल्पनेतून भारतातील पहिली मुरबाड तालुक्यातील फांगणे येथील आजिबाईंची शाळा येथे आजिबाईंना व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली आहे.

यावेळी प्रमुख म्हणून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे ,सरपंच वैभव सरोगते उपस्थित होते. नवीन पिढीने आजीबाईंच्या शाळेत येऊन शिक्षणाची आवड जाणून घ्या




नक्कीच तुम्हाला प्रेरणा मिळेल.असे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी बोलताना सांगितले.आजीबाईंची शिक्षणाची तळमळ पाहून मी खरंच भारावून गेलो आहे. आजीबाईंच्या शाळेला भेट देऊन इतर महिलांनी देखिल आजीबाईंचा आदर्श घ्यावा.असे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे यांनी बोलताना सांगितले.यावेळी कवी, पत्रकार मिलिंद जाधव यांनी साक्षर करूया गाव ही कविता सादर केली.यावेळी पत्रकार संघाच्या मुरबाड तालुका अध्यक्षपदी शंकर करडे, शहापूर तालुका अध्यक्षपदी प्रकाश जाधव, कल्याण तालुका अध्यक्षपदी योगेश गोडे यांची नियुक्ती करण्यात आली.तर भिवंडी मनपा क्षेत्र अध्यक्षपदी नितीन पंडित यांची निवड करण्यात आली आहे.तर भिवंडी ग्रा. तालुका अध्यक्ष पदावर पुन्हा मेघनाथ विशे यांची निवड करण्यात आली आहे. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे, ठाणे जिल्हा अध्यक्ष भगवान चंदे , ठाणे जिल्हा कार्याध्यक्ष संतोष गायकर, कल्याण कार्याध्यक्ष जैतू मुठोळकर, मुरबाड तालुका अध्यक्ष शंकर करडे, शहापूर तालुका अध्यक्ष प्रकाश जाधव ,कल्याण तालुका अध्यक्ष योगेश गोडे, सतिश घरत, अनंता घागस, सचिन पोतदार, मिलिंद जाधव, संजय फुलसुंदर, शितल मोरे, आकाश गायकवाड, बबन शेलार, जगदीश ठाकरे तर आदी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक योगेंद्र बांगर यांनी केले.

# अचलेर गावचे प्रगतशील शेतकरी चंद्रकांत कमळापुरे सावकार यांचे दुःखद निधन



लोहारा/विशेष प्रतिनिधी :लोहारा तालुक्यातील अचलेर गावचे अंत्यत शांत संयमी आणि विचारवंत असलेले व आधुनिक शेती मध्ये अंत्यत हुशार असलेले अचलेर पंचक्रोशीतील शेतकऱ्यांमध्ये सर्वात अगोदर आधुनिक आणि विविध तंत्रज्ञान वापरून शेती करणारे प्रगतशील शेतकरी अचलेर गावचा हिरा असलेले चंद्रकांत कमळापुरे सावकार यांचे आज रविवारी दिनांक ११ जुन २०२३ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले, मृत्यु समयीं ते जवळपास ६७ वर्षांचे होते, त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी सुना नातवंडे आणि आई असा फार मोठा परिवार आहे. चंद्रकांत कमलापुरे सावकार यांचे दुःखद निधन म्हणजे तरुण पिढीसाठी अंत्यत दुःखद घटना आहे , कारण चंद्रकात कमळापूरे सावकार हे अचलेर गावातील अंत्यत प्रतिष्ठित व्यक्ती तर होतेच, पण ते केवळ प्रगतशील च नाही तर आधुनिक शेतकरी होते.

अचलेर गावात सर्वप्रथम कमलापुरे सावकार यांनीच आधुनिक पध्दतीने शेती करण्यास प्रारंभ केला, आणि हे करत असताना त्यांनी त्याला विविध चालू तंत्रज्ञानाची जोड दिली. आधुनिक शेती करणे हे जरी खर्चिक असले तरी त्यांनी हे तंत्रज्ञान वापरले आणि शेतीचा विकास साधला अचलेर च्या तरुण पिढीला चंद्रकांत कमळापुरे यांचे शेतीसाठी चे योगदान फार मोठे राहिले आहे.ते अचलेर व पंचक्रोशीतील प्रत्येक गावात सावकार म्हणुन च ओळखले जात होते त्यांच्या पार्थिवावर आज रविवारी संध्याकाळी हजारोंच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले,यावेळी सुयश मीडिया ग्रुप च्या वतीने आणि इतर अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# घाटावरून परतले, पण चंद्रभागेच्या पात्रातील घाण पहायला नाही थांबले!

## लोकप्रतिनिधींच्या उदासिनतेवर समाजसेवक गणेश अंकुशराव यांची संतप्त प्रतिक्रिया!

पंढरपूर/प्रतिनिधीः आज पंढरपूर शहर दौर्यावर खासदार जयसिध्देश्वर स्वामी , आमदार समाधान आवताडे, आमदार सुभाष देशमुख आले होते. आषाढी वारीच्या पार्श्वभुमीवर त्यांचा हा दौरा अतिशय महत्वाचा होता; परंतु चंद्रभागेच्या पात्रातील घाणीचे साम्राज्य पहाण्यासाठी त्यांना वारंवार विनंती करुनही ते घाटावरुन परतले पण, नदीच्या पात्रात उतरले नाहीत! त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या या उदासिन भुमिकेमुळे महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी 'हे कसले लोकप्रतिनिधी?' असा सवाल करत एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.



गोपाळपूरच्या बंधार्याचे दरवाजे काढून मुंढेवाडीच्या बंधार्यावर हे दरवाजे बसवल्याने गोपाळपूरातून येणारे सांडपाणी चंद्रभागेच्या पात्रात साठून तुंबले आहे. आषाढी वारी तोंडावर आलेली असतानाच चंद्रभागेच्या पात्रातील पाण्यात सोडण्यात येणार्या सांडपाण्यामुळे प्रचंड घाणीचं साम्राज्य असून सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आढळून येत आहे, याकडं प्रशासनाचं अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने आपण चंद्रभागेच्या पात्रात येऊन पाहणी करावी व चंद्रभागेची स्वच्छता करण्याबाबत आदेश द्यावेत, अशी विनंती गणेश अंकुशराव यांनी वरील सर्व लोकप्रतिनिधींना केली परंतु त्यांनी हे नंतर कधी तरी बघू म्हणत कलाटणी देऊन पलायन केले. यावेळी भाजपाचे पदाधिकारीही उपस्थित होते. यानंतर गणेश अंकुशराव यांनी एक प्रसिध्दीपत्रक जाहीर करुन याद्वारे आपली नाराजी व्यक्त केली आहे.

चंद्रभागेतील घाण पाण्यामुळे भाविकांच्या अंगाला खाज सुटत असून अनेक भाविकांना त्वचारोग होऊ लागले आहेत, भाविकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ही गंभीर बाब लोकप्रतिनिधींनी स्वत: नजरेखालून घालणं आवश्यक होतं परंतु त्यांनी टाळाटाळ केल्याने त्यांना भाविकांच्या आरोग्याबाबत व सुरक्षेबाबत, भाविकांच्या सोयी-सुविधेबाबत किती आस्था आणि काळजी आहे ते दिसून आले, या प्रश्नाबाबत मी पालकमंत्र्यांकडेही तक्रार केलेली आहे, आता ते तरी याची दखल घेतात का नाही? ते दिसेलंच परंतु सद्यस्थितीत तरी लोकप्रतिनिधींना भाविकांच्या सोयी-सुविधेबाबत कोणतेही सोयरसुतक नसल्याचे ठळकपणे दिसत असून वरपांगी भाविकांच्या सोयीसुविधांबाबत गाजावाजा करत प्रसिध्दी करुन घेणारांचे 'खरे' चेहरे कसे आहेत ते जनतेनं आणि भाविकांनीच पहावे. असे मत या प्रसिध्दीपत्रकात गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले आहे.

# विविध ठिकाणी धाडी टाकून ५ बालकामगारांची सुटका

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या आदेशान्वये बालकामगार प्रतिबंधक मोहिमेंतर्गत शहर पोलीस अनैतिक व्यापार प्रतिबंधक कक्ष, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाइन आणि कामगार विभागाच्या संयुक्त पथकाने शहरातील विविध ठिकाणी धाडी टाकून पाच बालकामगारांची सुटका करण्यात आली. सदर बझार, मोदीखाना, मजरेवाडी, बेगमपेठ या परिसरातील विविध दुकानांमध्ये बालकामगार काम करीत होते. त्यांची सुटका करण्यात प्रतिबंधक पथकाला यश आले असून त्या बालकांना पुढील पुनर्वसनासाठी बालगृहात दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई बाल कल्याण समितीचे अध्यक्ष समीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली बालकामगार प्रतिबंधक अभियानाचे समन्वय अधिकारी तथा जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अतुल वाघमारे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. विजय खोमणे यांनी पार पाडली.

# 'ज्ञानोबा माऊली'च्या जयघोषात श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान

पुणे : 'टाळ वाजे, मृदुंग वाजे, वाजे हरीचा वीणा, मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणा... टाळ-मृदंगाच्या तालावर भजनात दंग वारकऱ्यांची पाऊले.... 'ज्ञानोबा माऊली', 'माऊली, माऊली' चा गजर.... डोक्यावर तुळशी वृंदावन, हाती दिंड्या-पताका घेतलेले वारकरी...अशा भक्तिमय वातावरणात आळंदी येथून आषाढी वारीसाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने आज पंढरपूरकडे प्रस्थान केले. आळंदी येथील समाधी मंदिरात पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पालखीचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार श्रीकांत भारतीय, माजी राज्यमंत्री संजय उर्फ बाळा भेगडे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त योगेश देसाई, विश्वस्त ड. विकास ढगे, गुरु हैबतबाबा यांचे वंशज बाळासाहेब पवार - आरफळकर आदी उपस्थित होते.

मानाच्या पालखी प्रदक्षिणेनंतर आळंदी संस्थान येथील गांधीवाडा देवस्थानाकडे पालखी सोहळ्याचे मुक्कामासाठी प्रस्थान झाले. प्रस्थान सोहळा 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. वारकऱ्यांसाठी सुविधा आषाढी वारीकरीता येणाऱ्या वारकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध



करुन देण्यासाठी जिल्हा प्रशासन, मंदीर संस्थान, पुणे व पिंपरी-चिंचवड मनपाने तयारी केली आहे. आळंदीत पाण्याची सोय, विजेची सोय, वैद्यकीय पथके, पालखी मार्गाचे वेळापत्रक, मंदिराच्या प्रवेशद्वारावर धातूशोधक यंत्रणा, सुलभ शौचालय, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, नदी पात्रात बोटीची व्यवस्था, सूचना फलक अशी व्यवस्था करण्यात आली असून जागोजागी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेल्या आहेत. तसेच ध्वनीक्षेपणाद्वारे सूचनाही देण्यात येत आहे.